RNI NO : MAHMAR/2022/84546

Postal No : BLD/228/2023-25

साप्ताहिक

# पब्लिक कॉन्टॅक्ट

9422180819 publiccontact2022@gmail.com PUBLIC CONTACT | मुख्य संपादक : गजानन राऊत | कार्यकारी संपादक : श्याम राऊत

|वर्ष ६ वे |अंक १ ला| गुरुवार दि. ५ फेब्रुवारी २०२६ ते ११ फेब्रुवारी २०२६| किंमत ५ रुपये| पृष्ठे ८

## खामगावात अप्पर जिल्हाधिकारी तर लाखनवाडा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर

### ना. आकाशदादा फुंडकर यांच्या मागणीला यश : शासकीय कार्यालयीन कामकाज होणार सोपे

**बुलडाणा** : खामगाव महसूल प्रशासन अधिक सक्षम, गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवार १० फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार खामगांव शहरात अपर जिल्हाधिकारी कार्यालय तर लाखनवाड़ा येथे अपर तहसील कार्यालयाची निर्मिती करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली, यासाठी कामगार मंत्री ना. आकाशदादा फुंडकर यांनी सातत्याने केलेल्या मागणीला यश आले आहे.



शासकीय कार्यालयांवरील वाढता कामाचा ताण, जिल्हे तालुक्यांचा मोठा भौगोलिक विस्तार, वाढती लोकसंख्या व नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल प्रशासन अधिक प्रभावी करणे, निर्णयप्रक्रिया वेगवान करणे व नागरिकांना वारंवार जिल्हा तालुका मुख्यालयात येण्याची गरज कमी करणे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. अपर जिल्हाधिकारी कार्यालयांच्या निर्मितीसाठी तालुक्यांची संख्या, लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, दुर्गम व आदिवासी भाग, जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावरील कामकाजाचा व्याप हे निकष निश्चित करण्यात आले आहेत. महसूल वसुली, जमाबंदी, जमीन सुधारणा कायदे, अपील प्रकरणे व गौण खनिजांशी संबंधित कामांचा ताण कमी करण्यास या कार्यालयांचा मोठा फायदा होणार आहे.

### >> नवीन ११ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय

अमरावती विभागात खामगांव, अचलपूर, पुसद, नागपुर विभागात १, कोकण विभागात २, संभाजी नगर विभागात १, पुणे विभागात ३, नाशिक विभागात १ असे एकूण ११ अपर जिल्हाधिकारी कार्यालयास मंजूरी मिळाली आहे. त्याचबरोबर राज्यात ६९ अपर तहसील कार्यालयांची निर्मिती करण्यात येणार असून, यामध्ये खामगांव तालुक्यातील लाखनवाड़ा कार्यालयांचा समावेश आहे.

### >> सामान्यांना मिळणार दिलासा

खामगाव येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय प्रस्तावित झाल्याने | बुलढाणा जिल्ह्यास मोठा प्रशासकीय दिलासा मिळणार असून घाटाखालील तालुक्यातील नागरिकांना याचा लाभ होणार आहे.यासोबतच लाखनवाडा, साखरखेर्डा, डोणगाव येथे अपर तहसील कार्यालयांची निर्मिती होणार असून, नागरिकांची महसूलविषयक कामे अधिक सुलभ व वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे.







# संपादकीय

## कुवतीची कोंडी

इतरांना धोकादायक ठरू शकणारा अपघात घडल्यावर वाहतूक तातडीने बंद करावी लागणारच. पण ते करताना लोकांना गृहीत धरून कसे चालेल?

घटना तशी नेहमीची नाही, तिचे गांभीर्य मोठे; पण झालेल्या परिणामांची तीव्रता कमी करणे हे केवळ आपल्या यंत्रणांचा ताळमेळ नसल्याने शक्य होत नाही. परिणामांबद्दलचा संतापच मूळ घटनेच्या गांभीर्यापेक्षा वाढतो, तो हा अजागळ कारभार दिसत राहिल्यामुळे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आडोशी बोगद्याजवळ मंगळवारी सायंकाळी प्रोपीलिन वायू भरलेला टँकर उलटल्यानंतर ३२ तासांहून अधिक काळ झालेल्या महाकोंडीच्या घटनेचे कवित्व अद्यापही सरलेले नाही. ही कोंडी सुटल्यानंतरही द्रुतगतीवरची कासवगती आणि काही काळासाठी मार्ग पुन्हा बंद पडणे, हे चक्र सुरूच आहे. ही महाराष्ट्रातल्या दोन मोठ्या, प्रगत, आर्थिक केंद्रे ठरलेल्या शहरांना जोडणाऱ्या द्रुतमार्गाची ही स्थिती आपल्या एकंदर व्यवस्थेला आरसा दाखवणारी ठरते. त्यामुळे तिची दखल आवश्यक.

आजच्यासारखे मोठ्या कंत्राटांनाच विकास मानले जात नव्हते तेव्हाच्या काळात- सुमारे २५ वर्षांपूर्वी- या द्रुतमार्गाच्या कल्पनेला नागपूरकर नितीन गडकरी यांच्याकडून गती मिळाली ती मुंबई आणि पुणे यांच्या महत्त्वाबद्दल शंका नव्हती, म्हणूनच. पण हा मार्ग सुरू झाल्यानंतरच्या काही वर्षांतच त्याचा वापर अतोनात वाढला. या मार्गाला द्रुतगती मार्ग तरी का म्हणावे, इतका वेळ या मार्गावरून पुणे-मुंबई वा उलटा प्रवास करणाऱ्या अनेकांना लागत असतो. विशेषत: घाटामध्ये तर रात्रीच्या वेळी हमखास कोंडीचीच हमी असते. अवजड वाहनांनी सर्रास त्यांच्यासाठीची मार्गिका सोडून गाड्या चालवणे आणि प्रवासी गाड्यांनी बेशिस्तीचे नवनवे उच्चांक गाठणे ही गावगन्ना स्पर्धा द्रुतमार्गावरही असतेच. मुद्दा असा की, यावर जी काही तातडीची पावले उचलणे आणि काही मूलभूत उपाययोजना करणे गरजेचे आहे, ते कधीही साधलेले नाही. उलट ही गैरसोय अंगवळणी पडते आणि तिची चर्चाही होत नाही. ती होण्यासाठी मंगळवारी सायंकाळी घडलेल्या टँकर उलटल्याच्या घटनेचे - आणि त्यानंतरच्या ३२ तासांच्या कोंडीचे- निमित्त लागते, हे अत्यंत चीड आणणारे: कारण या रस्त्यावरील प्रवासातील खंड हा प्रवाशांसाठी अत्यंत त्रासाचा आताचे निमित्त द्रुतगती मार्गावर मंगळवारी सायंकाळी प्रोपीलिन वायूचा टँकर उलटल्याचे. हा अत्यंत ज्वलनशील वायू भरलेला टँकर बाजूला करणे आणि तो वायू बाहेर पडू न देता दुसऱ्या टँकरमध्ये सुरक्षित बंद करणे आणि मग टँकर रस्त्यातून हटवणे अशी ही जोखमीची कामगिरी संबंधित यंत्रणांनी पार पाडली. याची प्रशंसा रसायनशास्त्रातील तज्ज्ञांनीच केली. अशी आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्याला आपली एक यंत्रणा उत्तम प्रतिसाद देऊ शकते, हे यातून दिसले. ते ठीक. पण या घटनेचा अटळ परिणाम - वाहतूक कोंडी- तो आधीच ताडून त्याचेही व्यवस्थापन अन्य यंत्रणांकडून का नीट होऊ शकत नाही? टँकर उलटल्यानंतर आणि त्यात ज्वलनशील वायू आहे, हे लक्षात आल्यानंतर त्याच्या जवळपास कुणी जाऊ नये, यासाठी वाहतूक तातडीने बंद करावी लागणारच. पण ती 'आज रात बारा बजेसे...' अशा थाटात लोकांना गृहीत धरून बंद करता येत नाही. अशा आणीबाणीच्या वेळी वाहतूक बंद करण्याचे चोख व्यवस्थापनच हवे. ते झाले नाही. कोंडीत रात्रभर अडकून पडलेल्या प्रवाशांच्या प्रतिक्रिया पाहिल्या, तर असे दिसते की ते अनेक तास जागच्या जागी होते आणि त्यांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यास फार उशीर झाला. मुळात अनेकांना कशासाठी वाहतूक थांबवली आहे, हेच बराच काळ कळले नाही. अशा वेळी संयम सुटून काही अनुचित घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? दुर्घटना घडली, त्या रस्त्याच्या अलीकडच्या आणि पलीकडच्या टोलनाक्यांवर तातडीने निरोप पोहोचवून १५-२० किलोमीटरच्या रांगा लागण्यापूर्वीच पर्यायी मार्गाने वाहतूक वळवता का नाही आली? असा अनेकांचा प्रश्न. तो रास्तच.

# आरोग्य रक्षणासाठी कठोर कायदा

गुटखा हा तंबाखू, सुपारी आणि हानिकारक रसायनांचे मिश्रण असलेला पदार्थ असून तो आरोग्यास अत्यंत घातक आहे. गुटखा सेवनामुळे तोंडाचा कर्करोग, दातांचे आजार, घशाचे विकार आणि अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. या धोक्यामुळे महाराष्ट्र सरकारने गुटखा उत्पादन, विक्री, वितरण आणि साठ्यावर कठोर बंदी घातली आहे.

महाराष्ट्रात २०१२ पासून गुटखा आणि सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी लागू करण्यात आली. ही बंदी केवळ आरोग्य संरक्षणासाठीच नाही तर तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठीही आहे. गुटखा विकणे किंवा साठवणे हा कायदेशीर गुन्हा मानला जातो. काही प्रकरणांमध्ये हा गुन्हा नॉन-बेलेबल (जामीन न मिळणारा) ठरवण्यात आला आहे, त्यामुळे दोषींवर कठोर कारवाई होऊ शकते.

राज्यात FDA (अन्न व औषध प्रशासन) आणि पोलीस यंत्रणा वेळोवेळी छापे टाकून अवैध गुटखा जप्त करतात. बस, ट्रक किंवा गुप्त मार्गाने गुटखा वाहतूक करणाऱ्यांवरही कारवाई केली जाते. तरीसुद्धा काही ठिकाणी गुटखा चोरीछुपे विकला जात असल्याने अधिक जनजागृती आणि कठोर अंमलबजावणीची गरज आहे.

गुटखा बंदीचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे, सार्वजनिक स्वच्छता वाढवणे आणि कर्करोगासारख्या प्राणघातक आजारांचे प्रमाण कमी करणे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने गुटखा सेवन टाळावे आणि अवैध विक्री दिसल्यास प्रशासनाला माहिती द्यावी. आरोग्यदायी जीवनासाठी गुटखा मुक्त महाराष्ट्र ही काळाची गरज आहे.

अ‍ॅड.आशा महेश भागवत
मो.नं. : 9975524868



Swami Vivekanand Shikshan Prasarak Bahhuddeshiy Sanstha
Khamgaon Tq Khamgaon Dist Buldhana 444303
(Reg.No F.12279/2010)

**Teacher's Recruitment for Academic Year 2026-2027**

**Jijau School of Scholar And Gunjkar Commerce and Science jr College Awar,At-Post Awar, Tq Khamgaon.Dist. Buldhana 444303.**

Application are invited for the following posts of assistant Teachers in Primary, Upper primary and High school Sections.

| Sr.No. | Post | No. Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | English | 4 | B.A, M.A English, D.Ed./ B.Ed. |
| 2 | Mathematics | 4 | B.Sc., MSc. Math B.Ed./ D.Ed. |
| 3 | Science | 4 | M.Sc. B.Ed. /B.Sc. D.Ed./B.Ed. |
| 4 | Social Science | 4 | Political Science, Economic, History M.A, B.Ed. / D.Ed. |
| 5 | Hindi | 4 | M.A Hindi B.Ed. / D.Ed. |
| 6 | Marathi | 2 | M.A Marathi B.Ed./D.Ed. |
| 7 | Computer | 2 | M.Sc. B.Sc. Computer/MCA/MCM, |
| 8 | Physics | 3 | B.Sc./M.Sc. Physics, B.Ed./D.Ed. |
| 9 | Chemistry | 3 | B.Sc./M.Sc. Chemistry, B.Ed. / D.Ed. |
| 10 | Biology | 3 | B.Sc./M.Sc. Zoo/Bot/Microbiology B.Ed. |
| 11 | PTE | 1 | B.P.Ed. |
| 12 | Clerk | 2 | Any Graduate With Computer Knowledge And Typing English. And Marathi. |

1) Preference Will Be Given To Experienced Candidates
2) Salary Negotiable.
3) Interested Candidates Must Apply with Full Details should Reach the office On Or Before
4) 14/02/2026 To the School Address or E-Mail: gunjkarcollege222@gmail.com
5) With Hard Copy&/Written Application Resume And Xerox Copies Of Certificates.
Interview Venue: Mean Office
Near Kalinka Mata Mandir Waman Nagar Khamgaon,
Tq Khamgaon Dist Buldhana 444303

**Interview Date:- 15-02-2026**
**Interview Time: -10.00 Am To 02:00 Pm**
**Contact: Chairman: Prof. R.D. Gunjkar Sir:- 9850327811.**
**Principal: Prof. S.M. Raibole Sir: 8208090649.**

"Printed by Sanjay Pralhad Vinke Published by Gajanan Kisanrao Raut on behalf of Gajanan Kisanrao Raut and Printed at Printwell Offset , Keshav Nagar, Ghatpuri Road, Khamgaon and published from At.Post,Sutala BK, Tq. Khamgaon, Dist. Buldana Editor Gajanan Kisanrao Raut

पब्लिक कॉन्टॅक्ट हे साप्ताहिक मालक, संपादक, प्रकाशक गजानन किसनराव राऊत यांनी संजय प्रल्हाद विणके, मुद्रक यांच्या प्रिंटवेल आफ सेट, केशव नगर, घाटपुरी रोड, खामगांव ४४४३०३ येथे छापून सा. पब्लीक कॉन्टॅक्ट कार्यालय, मु.पो. सुटाळा बु. ता. खामगांव, जि. बुलडाणा येथे प्रसिध्द केले. या अंकातील सर्व लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही.पी. आर. बी. कायद्यानुसार वाद खामगांव न्यायालया अंतर्गत. RNI NO: MAHMAR/2022/84546

# यंदाच्या उसळीनंतर आर्थिक गती मंदावरणार, आगामी दोन वर्षासाठी आयएमएफ चा अंदाज

चालू २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी भारताच्या 'सकल देशांतर्गत उत्पादन' (जीडीपी) वाढीचा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात 'आयएमएफ'ने पूर्वी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा ०.७ टक्क्यांनी वाढवून ७.३ टक्क्यांवर नेणारा सुधारित अंदाज सोमवारी व्यक्त केला. मात्र नंतरच्या दोन वर्षांत हा विकासदर भारताला कायम राखता येणार नसल्याचे भाकीतही तिने वर्तविले.



२०२६ आणि २०२७ या दोन्ही वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ६.४ टक्के दराने वाढेल, असा तिचा ताजा अंदाज आहे.

वॉशिंग्टनस्थित या जागतिक संस्थेने १ एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या २०२६-२७ आर्थिक वर्षासाठी आणि नंतरच्या २०२७-२८ अशा आगामी दोन वर्षांत देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग मंदावून ६.४ टक्क्यांपर्यंत खाली येईल, असे 'जागतिक आर्थिक दृष्टिकोन' नामक अवलोकनांत म्हटले आहे.

'जीडीपी' वाढीचा हा अंदाज तीन महिन्यांपूर्वी म्हणजेच ऑक्टोबरमध्ये व्यक्त केलेल्या ६.२ टक्क्यांपेक्षा जास्त असला तरी चालू वर्षासाठी अंदाजलेला ७.३ टक्क्यांचा विकास दर यापुढे टिकवता येणार नसल्याचे तिने म्हटले आहे.

जागतिक वाढीचा वेग मंदावण्याची चिन्हे 'आयएमएफ'च्या अहवालानुसार, जागतिक वाढीचा वेगही मंदावण्याची चिन्हे आहेत. या स्थितीत भारत पुढील दोन वर्षांत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान कायम ठेवू शकणार आहे. आगामी दोन वर्षांतील भारताची ६.४ टक्के दराने वाढ ही जागतिक आणि प्रगत अर्थव्यवस्थांच्या सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त असेल.

जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर २०२६ मध्ये किंचित वाढून ३.३ टक्के आणि २०२७ मध्ये ३.२- टक्के पातळीवर स्थिर राहण्याचा 'आयएमएफ'चा अंदाज आहे. चीनसाठी २०२५-२६ मधील वाढीचा दर तिने ०.२ टक्क्यांनी वाढवून ५ टक्क्यांवर नेला आहे.


शेअर बाजारातील पडझड कायम चालू वर्षासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दलच्या मजबूत दृष्टिकोनानंतरही, सोमवारी त्याचे शेअर बाजारात अपेक्षित सकारात्मक प्रतिबिंब उमटताना दिसले नाहीत. जगभरातील अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पप्रणीत शुल्कवाढीच्या जोखमीबद्दलच्या चिंतेने बाजाराला ग्रासलेले दिसून आले. परिणामी सेन्सेक्स ३२४ अंशांनी, तर निफ्टी १०९ अंशांनी गडगडला. परकीय गुंतवणूकदार वेगाने माघारी परतत असल्याचा ताण रुपयाच्या मूल्यावरही दिसून आला आणि त्याने महिनाभरात दुसऱ्यांदा प्रतिडॉलर ९१ची पातळी ओलांडली.

## कामगार संघटनांकडून आज 'भारत बंद'! काय आहेत प्रमुख मागण्या?

**वृत्तसंस्था:** केंद्रसरकारच्या कामगार व शेतकऱ्यांबाबतच्या धोरणांविरोधात आज, १२ फेब्रुवारी देशव्यापी बंदची हाक देण्यात आली आहे. मुंबईत वांद्रे येथील कामगार आयुक्त कार्यालयावर दुपारी तीन वाजता निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे. विविध केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीने हा निर्णय जाहीर केला. महाराष्ट्रात कामगार, कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली इंटक, आयटक, एचएमएस, सीटीयू, एनटीयूआय, भारतीय कामगार सेना, एआयसीसीटीयू, एआयबीईए, बीईएफआय, एआयआयईए, राज्य सरकारी कर्मचारी महासंघ, श्रमिक एकता मंच, कामगार एकता, स्वतंत्र फेडरेशन आदी २०हून अधिक संघटना एकवटल्या आहेत.




कामगार आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकार कठोर, निगरगट्ट मनाचे झाले आहे. झोपेचे सोंग घेतलेल्या केंद्र सरकारला आता दिल्ली दरबारी संसदेत खासदारांद्वारे जागे करावे लागेल. मुंबईसह देशभरातील सार्वजनिक क्षेत्रातील एनटीसीच्या २३पेक्षा अधिक गिरण्या गेली पाच वर्षे बंद आहेत. कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या उपासमारीला अंत उरलेला नाही. २९ जुने सक्षम कामगार कायदे रद्द करून, चार कामगार संहिता केंद्र सरकारने लागू केल्या आहेत. त्यामुळे कामगारवर्ग अडचणीत आला आहे,' असे ते म्हणाले. कामगार संघटनांनी शंभर वर्षांच्या लढ्यातून मिळविलेले कामगार हिताचे २९ कायदे विद्यमान केंद्र सरकारने रद्द करून चार कामगार संहिता लागू केल्या आणि कामगार वर्गाचे भविष्यच अंधारात आणले,' असा आरोप महाराष्ट्र इंटकचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी केला.

शेतकरी बंधूंनो ...

शेतमालाला जास्त भाव पाहिजे?
तर मग जरूर आपले सोयाबीन, गहू, ज्वारी, मूंग, उडीद चना क्लिनिंग करा



गजानन ॲग्रो इंडस्ट्रीज
धान्य क्लिनिंग प्लांट व दालमिल
प्लॉट नं. A/86, M.I.D.C. खामगाव जि. बुलडाणा
9422200095, 9422180819

# 'शिक्षणातून मूल्याधिष्ठित नागरिक घडविणे महत्वाचे' : कुलगुरू डॉ. बारहाते

## शिंगणे महाविद्यालयात आंतरविद्याशाखीय परिषदेचे उद्घाटन

**खामगाव :** शिक्षणातून मूल्याधिष्ठित नागरिक घडविणे महत्त्वाचे असे प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. ते मंगळवार दि.०३ फेब्रुवारी रोजी सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगाव, येथे एक दिवसीय आंतरविद्याशाखीय परिषदेच्या उद्घाटनीय भाषणात बोलत होते. सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगाव स्व.छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालय, अचलपूर कॅम्प आणि श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल महाविद्यालय, मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'मानवी विकासाचे पैलू : बहूआयामी दृष्टिकोन'या महत्वपूर्ण विषयावर एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव येथे करण्यात आले होते.



या परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ. सद्गुण देशमुख तर उद्घाटक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ .मिलिंद बारहाते तर बीजभाषक म्हणून डॉ. जे. आर. सोनवणे महाराजा कृष्णकुमारसिंहजी भावनगर युनिव्हर्सिटी, भावनगर हे उपस्थित होते. डॉ. अश्विन निसारता चिल्ड्रेन्स युनिव्हर्सिटी गांधीनगर, दादासाहेब तारे शिक्षण संस्था, अचलपूरचे सचिव श्रीपादजी तारे, के.के. अग्रवाल महाविद्यालय मलकापूर येथील प्राचार्य श्री. शक्तीसिंग राजपूत, प्राचार्य संजय पाटील , प्राचार्य काशिनाथ बराटे प्रामुख्याने उपस्थित होते. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ. सद्गुण देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मानवी विकास साधायचा असेल तर सर्वप्रथम माणसाने माणसांशी माणसासम वागून आपल्या प्रत्यक्ष कृतीतून, आचार- विचारातून मानवी विकास साधला पाहिजे असे विचार याप्रसंगी व्यक्त केले.

बीजभाषक डॉ. जे. आर. सोनवणे यांनी साहित्यातून मूल्यांची निर्मिती होऊन समृद्ध विचार प्रक्रियेचा विकास होतो हे स्पष्ट केले. प्रा.डॉ.अश्विन निसारता यांनी मानवी विकासाचे अनेक पैलू विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रा.डॉ. रवींद्र मुंद्रे यांनी सामाजिक शास्त्रामध्ये मानवी विकासाचे अनेक पैलू दडलेले आहेत असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या सत्रातील दुसरे वक्ते डॉ. सुरजप्रसाद शुक्ला यांनी अनेक साहित्यिकांच्या लेखनातून

# गटई कामगारांसाठी पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना

## २० फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**खामगाव :** गटई काम (कातडी सोलणे व त्यापासून चपला-जोडे तयार करणे) करणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करून देण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत सन २०२५–२६ या वर्षासाठी योजना राबविण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांनी आपले अर्ज दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत प्रत्यक्ष सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पात्रतेच्या अटी व शर्ती:**

1. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून त्यावर पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटविलेला असावा. 2. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा. 3.अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न • ग्रामीण भागासाठी ८०००० पेक्षा अधिक नसावे • शहरी भागासाठी १,००,००० पेक्षा अधिक नसावे (तहसीलदाराने निर्गमित केलेले उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक) किंवा अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असावा. 4. अर्जदाराचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे. 5. ज्या जागेसाठी स्टॉल मागितला आहे ती जागा ग्रामपंचायत, नगर परिषद/नगरपालिका, छावनी बोर्ड (कटक मंडळ) किंवा महानगरपालिका यांच्याकडून भाडेकराराने/खरेदीने/मोफत अधिकृत ताब्यात दिलेली असावी किंवा अर्जदाराची स्वतःची मालकीची असावी. यासंबंधी कागदपत्र जोडणे आवश्यक. 6. अर्जदाराचा अधिकृत जातीचा दाखला जोडणे बंधनकारक. 7.शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड प्रत, आधार कार्ड प्रत, अधिवास प्रमाणपत्र इत्यादींच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक.

**अर्ज सादर करण्याबाबत सूचना:**

• विहित नमुना अर्ज विनामूल्य सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातून प्राप्त करून घ्यावा.
• आवश्यक सर्व कागदपत्रांसह पूर्ण अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे दि. २०/०२/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत सादर करावा.

# तुती लागवडीसाठी शेतकऱ्यांनी ५ मार्चपर्यंत नोंदणी करावी

**बुलडाणा :** जिल्ह्यात नवीन तुती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी ५ मार्च २०२६ पर्यंत करण्यात येणार आहे. यासाठी 'आपले सरकार' पोर्टलवर वस्त्रोद्योग विभाग निवडून ऑनलाईन नोंदणी अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यात तुती लागवडीद्वारे रेशीम कोष उत्पादनाला अनुकूल वातावरण असून, या उद्योगात सातत्याने वाढ होत आहे. तुती लागवडीमुळे शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न मिळत असून, एक एकर क्षेत्रातून दुसऱ्या वर्षापासून दोन लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येत आहे.

रेशीम कोष उत्पादनाच्या वाढत्या प्रमाणामुळे जालना, बीड, बडनेरा, सोलापूर, बारामती व नागपूर येथे कोष बाजारपेठा सुरू करण्यात आल्या आहेत. शासनाचे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे धोरण रेशीम उद्योगाद्वारे साध्य होत असल्याचे चित्र आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी १ एकर तुती लागवड, जोपासना व कीटक संगोपन गृहासाठी तीन वर्षांत एकूण 895 मनुष्य-दिवसांची मजुरी दिली जाते.

यामध्ये मजुरीपोटी रु. 2 लाख 79 हजार 240 व साहित्यासाठी रु. 1 लाख 53 हजार असे एकूण 4 लाख 32 हजार 240 अनुदान देण्यात येते. केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-2 योजनेअंतर्गत तुती लागवडीसाठी प्रति एकर 54 हजार, सिंचन संचासाठी प्रति एकर 54 हजार, कीटक संगोपन गृहासाठी 2 लाख 43 हजार 750, संगोपन साहित्यसाठी 37 हजार 500, व निर्जंतुकीकरण औषधांसाठी 3 हजार 750 असे एकूण 3 लाख 75 हजार अनुदान उपलब्ध आहे. बहुभूधारक शेतकऱ्यांना या योजनेतून २ एकर तुती लागवड करता येऊन एकूण 5 लाख 62 हजार 500 अनुदान दिले जाते.

# आतड्यांचा कॅन्सरचा धोका टळेल, लगेच खा 'हे' अगदी 10-15 रूपयांत मिळणारे 10 खास पदार्थ,

गेल्या काही वर्षांत कोलन कॅन्सर हा सर्वात सामान्य गॅस्ट्रोइंटेस्टाइनल कॅन्सरपैकी एक बनला आहे आणि तरुणांमध्ये त्याचे प्रमाण वाढत आहे ज्यामुळे डॉक्टर म्हणतात की लक्षणे दिसण्यापूर्वीच आतडे मजबूत व हेल्दी ठेवणा-या दैनंदिन सवयींकडे अधिक गांभीर्याने पाहणं गरजेचं आहे. डॉक्टर सौरभ सेठी, एमडी एमपीएच यांनी इंस्टाग्रामवर आतड्याच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करणारे हे 10 पदार्थ सुचवले आहेत.

आजच्या धावपळीच्या जगात आपण काय खातोय यापेक्षा आपण किती लवकर खातोय, याला जास्त महत्त्व दिलं जातं. पण या गडबडीत आपल्या शरीरातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग, आपलं 'आतडं' कुठेतरी दुर्लक्षित राहतंय. अलीकडच्या काळात 'कोलन कॅन्सर' म्हणजेच मोठ्या आतड्याच्या कर्करोगाचे प्रमाण तरुणांमध्ये ज्या वेगाने वाढत आहे, ते पाहून वैद्यकीय क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर्वी हा आजार पन्नाशीनंतर होणारा समजला जायचा, पण आज विशी-तिशीतील मुलंही याच्या विळख्यात सापडत आहेत. आपलं आतडं हा शरीराचा असा भाग आहे जिथून आपल्या आरोग्याची खरी सुरुवात होते. जेव्हा आपण चुकीचा आहार घेतो, तेव्हा





तिथले जंतू आणि पेशी आपल्याला सावध करत असतात, पण आपण त्याकडे दुर्लक्ष करतो.

मात्र, घाबरून जाण्यापेक्षा आपल्या स्वयंपाकघरात डोकावून पाहिल्यास आपल्याला या गंभीर आजारापासून वाचवणारी ढाल सापडू शकते. एमडी एमपीएच डॉ. सौरभ सेठी यांनी इंस्टाग्रामवर आतड्याच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करणारे १० पदार्थ सांगितले आहेत. डॉक्टर म्हणतात त्याप्रमाणे, लक्षणे दिसण्याची वाट पाहण्यापेक्षा आपल्या रोजच्या सवयी बदलणे हाच खरा शहाणपणा आहे. या लेखात आपण अशा काही पदार्थांबद्दल जाणून घेणार आहोत, जे तुमच्या आतड्यांचे आरोग्य शांतपणे सुधारतात आणि कर्करोगासारख्या संकटापासून तुम्हाला दूर ठेवतात.